स्वयंसेवी निरीक्षण गृहातील कर्मचा-यांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत दरमहा वेतन देणेबाबत.

2004071915521600-2500

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्र: निगृयो २००२ /प्र.क्र.३२१ /का.३

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला, मंत्रालय, मुंबई.४०००३२.

दिनांक :- १८ ऑक्टोंबर , २००३

वाचा : आयुक्त , महिला व बाल विकास यांचे पत्र क्र. मबाविआ /कर्मचारी मागण्या /०२-०३/का.५अ /२७५३, दिनांक २३.२.२००३ आणि दिनांक १०.७.२००३.

प्रस्तावना : स्वयंसेवी संस्थेमार्फत कार्यरत असलेल्या निरीक्षण गृहातील कर्मचा-यांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेमार्फत दरमहा वेतन देण्याबाबत येणा-या अडचणींच्या अनुषंगाने या संस्थांना वेतनावरील अनुदान तीन हप्त्यात वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने स्वयंसेवी संस्थेमार्फत कार्यरत निरीक्षण गृहातील कर्मचा-यांच्या वेतनावरील अनुदान तीन हप्त्यात एप्रिल मध्ये ५०% ऑक्टोंबर मध्ये २५% व अंतिम हप्ता जानेवारी मध्ये वितरीत करण्यात शासन मान्यता देत आहे. याकरीता नियम, अटी व कार्यपध्दती निश्चित करुन अंतिम आदेश आयुक्त, महिला व बाल विकास अधिकारी यांचे कडून काढण्यात यावेत.

मात्र खर्चावर नियंत्रण राहण्याचे दृष्टीने वित्त विभाग व महिला व बाल विकास विभाग वेळोवेळी ज्या सूचना देईल त्यानुसारच खर्च करण्यात यावा. खर्चाचा आढावा दर तीन महिन्यानी आयुक्त, महिला व बाल विकास , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचेमार्फत घेतला जावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने ,

(पां. वि. [illegible]रकर)
उप सचिव , महाराष्ट्र शासन.

प्रति,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १ , (लेखा परिक्षा) ,मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १ , (लेखा व अनुज्ञेयता) ,मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
प्रधान सचिव , महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी .
सचिव , महाराष्ट्र राज्य परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना , पुणे.
कक्ष अधिकारी (कार्यासन ४) , महिला व बाल विकास विभाग , मंत्रालय, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी.
निवड नस्ती का-३.